अपंगांसाठी सुयोग्य ठरण्यात आलेल्या पदांबाबत...

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः न्यायाप्र-२००६/प्र.क्र.९/सुधार-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : 13 ऑगस्ट, २००९.

**शासन निर्णय :-** अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग)अधिनियम, १९९५ मध्ये किमान ४०% अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींना अन्य सोयी सवलतींसह शासकीय /निमशासकीय सेवेत अस्थिव्यंग, कर्णबधिर व अंध व्यक्तींसाठी प्रत्येकी १% याप्रमाणे एकूण ३% आरक्षण ठेवण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर अधिनियमात अपंगत्वाचे प्रकार खालीलप्रमाणे विहीत केलेले आहेत :-

१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (blindness or low vision)
२) श्रवण शक्तीतील दोष (hearing impairment)
३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु (locomotor disability or cerebral palsy)

वरीलप्रमाणे किमान ४०% अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींसाठी पदे राखीव ठेवून भरणे आवश्यक आहे. परंतु, अपंगत्वाचे प्रकार वरीलप्रमाणे नमूद न करता अंशतः कर्णबधीर, अंशतः अंध किंवा एका पायाने अधू, एका हाताने अधू, दोन्ही हाताने /पायाने अधू अशा व्यक्तींना नेमणूक देण्यात येते. परंतु, असे करणे हे अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ चा भंग करणारे आहे. तेव्हा सर्व शासकीय, निमशासकीय संस्थांमध्ये अपंगांसाठी पदनिश्चिती करताना अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मध्ये नमुद केलेल्या अपंग प्रकारानुसार अपंगत्वासाठी पदे राखून ठेवण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. तेव्हा त्याप्रमाणे सर्व मंत्रालयीन विभागाने आपल्या व आपल्या विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील सर्व संवर्गातील अपंगासाठी पदे निश्चित करताना वर नमूद ३ प्रकारांसाठीच पदे निश्चित करुन ती भरण्याबाबतची कार्यवाही करावी. अपंगासाठी पदे भरण्याकरिता जाहिरात प्रसिध्द करताना अंशतः कर्णबधीर, अंशतः अंध किंवा एका पायाने अधू, एका हाताने अधू, दोन्ही हाताने /पायाने अधू असे नमुद न करता जाहिरात प्रसिध्द करावी.त्याच प्रमाणे जास्तीत जास्त अपंगत्व असणा-या उमेदवाराना प्राधान्य देण्यात यावे.

२. सदरहू शासन निर्णय सर्व मंत्रालयीन विभागांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणावा.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक - 200808139122823009 -असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(किशोर गजभिये)
**सचिव,सामाजिक न्याय**

प्रति :-
सर्व अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.

कृ.मा.प/-

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डींग,हुतात्मा चौक,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त,अपंगकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, वि.जा.भ.ज. व इ.मा.व. संचालनालय,पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी,जि.प.
सर्व सेवायोजन अधिकारी, जिल्हा सेवायोजन केंद्रे
विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती-सुधार-३